# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि-३/संपमूमं/२०६/२०२४

प्रति,

दिनांक : २० मे, २०२४

प्राचार्य / केंद्राधिकारी,
संबंधित महाविद्यालये / परीक्षा केंद्रे
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,

**विषय :** **पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या उन्हाळी-२०२४ परीक्षेबाबत.**
**संदर्भ :** (१) क्र.संगाबाअवि-३/सपमुमं/१३३/२०२४, दिनांक : ०२/०४/२०२४
(२) अधिसूचना क्र. ४५/२०२४, दिनांक १३-०५-२०२४

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यांत येते की, उपरोक्त संदर्भ क्र. (१) वरील पत्रानुसार पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची उन्हाळी-२०२४ ची लेखी परीक्षा दि.२८-०५-२०२४ रोजी घेण्याबाबत जाहीर करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील सी.बी.सी.एस. पद्धतीमधील पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची उन्हाळी-२०२४ ची लेखी परीक्षा दि. २७-०५-२०२४ रोजी घेण्याबाबत त्या-त्या परीक्षेच्या सत्र-४ च्या वेळापत्रकानुसार जाहीर करण्यात आले आहे.

तथापी, शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये सत्र-१ व २ तसेच शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये सत्र-३ व ४ ला इतर सर्व विद्याशाखेतील बहुतांश अभ्यासक्रमांना सी.बी.सी.एस. पद्धती लागू करण्यात आलेली आहे. त्यामधील काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा योजनेत लेखी परीक्षेच्या गुणांबाबत तफावत आढळून आलेली आहे. त्यामुळे त्याबाबत संबंधीत विभागाकडून शहानिशा सुरू आहे.

उपरोक्त परिस्थीती तसेच दिनांक दि. २७-०५-२०२४ व २८-०५-२०२४ च्या परीक्षेचा कालावधी लक्षात घेता, **पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या उन्हाळी-२०२४ परीक्षेबाबत** खालील प्रमाणे निर्देशित करण्यात येत आहे.

(१) अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील सी.बी.सी.एस. पद्धतीमधील पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची उन्हाळी-२०२४ ची लेखी परीक्षा नियोजीत वेळापत्रकानुसार म्हणजेच दि.२७-०५-२०२४ रोजी होईल.

(२) अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील **बी.आर्च. सत्र-४ (सी.बी.सी.एस.) पद्धतीमधील** परीक्षा योजनेत पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाचा विषय दर्शविला नसल्यामुळे उन्हाळी-२०२४ ची सदर विषयाची लेखी परीक्षा जाहिर करण्यात आलेली नव्हती. तथापी, संदर्भ क्र.(२) वरील अधिसूचनेनुसार पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रम सदर परीक्षेला लागू झालेल्या असल्यामुळे **बी.आर्च. सत्र-४ (सी.बी.सी.एस.) पद्धतीमधील** पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा अभियांत्रिकी व तांत्रिकी शाखेतील इतर अभ्यासक्रमांप्रमाणे दि.२७-०५-२०२४ रोजी निर्धारीत वेळेवर होईल.

(३) शैक्षणिक सत्र २०२२-२३ पूर्वी अस्तित्वात असलेल्या सी.जी.एस. पद्धतीच्या अभ्यासक्रमांची (Law (5 Yr) व B.Voc. सह) पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची उन्हाळी-२०२४ ची लेखी परीक्षा नियोजीत वेळापत्रकानुसार म्हणजेच दि.२८-०५-२०२४ रोजी होईल.

(४) शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये **सत्र-४ ला नवीन सी.बी.सी.एस. पद्धतीमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या** उन्हाळी-२०२४ च्या लेखी परीक्षेबाबत यथावकाश कळविण्यात येईल.

कृपया उपरोक्त वेळापत्रकातील दुरूस्ती लक्षात घेउन सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना याची जाणिव करून द्यावी, ही विनंती.

(सौ.एम.डी.तोटे (पाटील))
संचालक (प्रभारी),
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रति,**
१) प्रमुख, संगणक केंद्र, उपरोक्त वेळापत्रकातील दुरुस्ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस्तव.

**प्रतिलिपीः माहीती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**
२) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३) मुख्य अधिकारी, केंद्रीय मुल्यांकन कार्यक्रम केंद्र
४) उपकुलसचिव (परीक्षा/चौकशी)
५) सहा.कुलसचिव (सारणी/परीक्षा/गोपनीय)

**प्रत सविनय अग्रेषित-**
मा.सदस्य, व्यवस्थापन परिषद / परीक्षा व मूल्यमापन मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

*****